आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३० जून २०२५ - सोमवार

ठळक बातम्या

- राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात, पहिल्या दिवशी ५७ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

- राज्याचे मुख्य सचिव म्हणून राजेश कुमार यांनी स्वीकारला पदभार

- लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठीची रेल्वेची भाडेवाढ उद्यापासून लागू होणार

- आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना उद्यापासून एसटीच्या तिकीटात १५ टक्के सवलत मिळणार
- ज्ञानेश्वर माऊलींचा सोलापूर जिल्ह्यात प्रवेश

<><><><>

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आज प्रारंभ झाला. आजच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला मंत्री छगन भुजबळ यांचा परिचय करून दिला. त्यानंतर विविध अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याची घोषणा विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. त्यानंतर विधानसभेचे तालिका सदस्य म्हणून अमित साटम, किशोर पाटील, सुलभा खोडके, चेतन तुपे, नितीन देशमुख, संजय मेश्राम, अभिजित पाटील, समीर कुनावार आणि समाधान आवताडे यांची नियुक्ती केली.

यानंतर, विधानसभेत माजी आमदार रोहिदास देशमुख, विख्यात खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते लहानू कोम आणि समाजसेविका डॉ. श्रद्धा टापरे यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मांडला आणि सर्व सदस्यांनी दोन मिनिटं स्तब्ध राहून तो संमत केला. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी तालिका सभापती म्हणून अमित गोरखे, □द्रिस नायकवाडी, कृपाल तुमाने, सुनील शिंदे आणि प्रज्ञा सातव यांची नियुक्ती केली. यानंतर, विख्यात खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, विधानपरिषदेचे माजी सदस्य अरुण जगताप आणि डॉ. रामदास आंबटकर यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव विधानपरिषद सभापती राम शिंदे यांनी मांडला आणि सर्व सदस्यांनी दोन मिनिटं स्तब्ध राहून तो संमत केला. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

<><><><>

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधीमंडळात सादर केल्या. हा निधी प्रामुख्याने रस्ते, मेट्रो, पायाभूत सुविधा प्रकल्प, सिंहस्थ कुंभमेळ्याचं नियोजन आणि अंमलबजावणी, महात्मा ज्योतिराव फुले आरोग्य योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, दुर्बल आणि वंचित समाजघटकांच्या विकासाकरता उपयोगात आणला जाणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी या पुरवणी मागण्यांवर प्रतिक्रिया दिली.

- होल्ड बाईट - जयंत पाटील -

<><><><>

विधिमंडळाच्या कामकाजाला सुरुवात होण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी विधान भवन प्रांगणातल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. दरम्यान, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मराठीच्या मुद्द्यावरून विधान भवनाच्या पायऱ्यांवर निदर्शनं केली. त्यानंतर सदस्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केलं. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे रोहित पवार, जितेंद्र आव्हाड आणि इतर यावेळी उपस्थित होते.

<><><><>

राज्याचे मुख्य सचिव म्हणून वरिष्ठ सनदी अधिकारी राजेश कुमार यांनी आज मावळत्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडून पदभार स्वीकारला. मुख्य सचिव पदी नियुक्ती झालेले राजेश कुमार ४९वे सनदी अधिकारी आहेत. राजेश कुमार हे १९८८च्या तुकडीचे सनदी अधिकारी आहेत. दरम्यान, पुढचे आदेश येईपर्यंत राज्य सरकारने महसूल विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदाचा कार्यभार राजेश कुमार यांच्याकडेच कायम ठेवला आहे.

<><><><>

यंदा गोकुळाष्टमीच्या पार्श्वभूमीवर गोविंदा उत्सव सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीनं पार पाडण्यासाठी राज्यातल्या दीड लाख गोविंदांना विमा देण्याबाबत शासनाकडून लवकरच निर्णय जाहीर होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज दिली.

<><><><>

रेल्वेच्या प्रवासी भाड्यात उद्यापासून वाढ करायचा निर्णय रेल्वे मंत्रालयानं घेतला आहे. लांब पल्ल्याच्या गाड्यांचं तिकिट थोडं महाग होणार असलं तरी लोकलचा प्रवास मात्र महागणार नाही.

पॅसेंजर गाड्यांच्या विनावातानुकूलित सामान्य श्रेणीसाठी ५०० किलोमीटर अंतरापर्यंत कोणतीही भाडेवाढ लागू होणार नाही. ५०१ ते १ हजार ५०० किलोमीटर अंतरासाठी पाच रुपये, त्यापुढे अडीच हजार किलोमीटर अंतरापर्यंत १० रुपये, त्यापुढे तीन हजार किलोमीटर अंतरासाठी १५ रुपये भाडेवाढ उद्यापासून लागू होणार आहे. तर शयनयान श्रेणी आणि पहिल्या वर्गासाठी अर्धा पैसा प्रति किलोमीटर या दरानं भाडेवाढ होईल.

मेल आणि एक्सप्रेस विनावातानुकूलित गाड्यांसाठी पहिल्या, दुसऱ्या आणि शयनयान श्रेणीसाठी प्रति किलोमीटर एक पैसा दरवाढ केली आहे. तर एसी श्रेणीसाठी २ पैसे प्रति किलोमीटर इतकी दरवाढ उद्यापासून लागू होईल. उपनगरी रेल्वे प्रवासाच्या, तसंच उपनगरी आणि सामान्य मार्गांवरच्या हंगामी तिकिटांच्या दरात कोणतेही बदल केलेले नाहीत. याव्यतिरिक्त इतर कोणत्याही शुल्कात बदल होणार नाहीत.

<><><><>

एसटीच्या लांब आणि मध्यम पल्ल्याच्या प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना उद्यापासून तिकीट दरात १५ टक्के सवलत मिळणार आहे. प्रवाशांना प्रत्यक्ष तिकीट खिडकीवर, एसटीच्या अधिकृत संकेतस्थळावर, तसंच ॲपवर आगाऊ आरक्षण करता येईल. दिवाळी आणि उन्हाळी सुट्ट्यांचा गर्दीचा काळ सोडता वर्षभर ही योजना सुरू राहील. मात्र, फक्त पूर्ण तिकीट काढणाऱ्या, कोणत्याही सवलतीचा लाभ न घेणाऱ्या प्रवाशांनाच या योजनेचा फायदा घेता येईल. तसंच जादा गाड्यांसाठी ही सवलत लागू नसेल.

<><><><>

आषाढी एकादशीनिमित्त आळंदी इथून निघालेल्या श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आगमन आज सोलापूर जिल्ह्यातल्या धर्मपुरीत झालं. विठूनामाच्या गजरामध्ये माऊलींच्या पादुकांचे वारकऱ्यांनी दर्शन घेतलं. पालखी आगमनापूर्वी धर्मपुरी इथं सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने विविध जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले होते.

ज्ञानेश्वर माऊलींची पालखी त्यानंतर सोलापूर जिल्ह्यातल्या पहिल्या मुक्कामासाठी नातेपुते कडे मार्गस्थ झाली आहे. प्रशासनातर्फे पालखी मार्गांवर स्वच्छ पिण्याचे पाणी, पुरेशी शौचालये, आरोग्य सेवा, मोफत मोबाईल चार्जिंग पॉईंट, १०८ ॲम्ब्युलन्स सेवांसह वारकऱ्यांसाठी फूट मसाजची सेवा सुरू केली आहे.

<><><><>

आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेतर्फे ७ विशेष गाड्या सुरू होणार आहेत. १ ते १० जुलैपर्यंत पुणे ते मिरज, मिरज ते नागपूर आणि मिरज ते लातूर अशा ३ एकेरी गाड्या ,उधना-मिरज या विशेष गाडीच्या ४ फेऱ्या, मिरजेपर्यंत एकेरी अशा विशेष गाड्यांसह मध्य रेल्वे सध्या ८३ आषाढी विशेष गाड्या चालवत आहे.

<><><><>

हिंदी भाषेच्या सक्तीचा अध्यादेश रद्द होणं हा मराठी माणसाच्या एकजुटीचा विजय असल्याचं म्हणत येत्या ५ जुलै रोजी विजयी मेळावा होईल, असं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जाहीर केलं आहे.

<><><><>

गेल्या २४ तासांत राज्यांत विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडला. पुढील दोन दिवसांत कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><>//